# कुलगुरू तथा निवडणूक अपिलीय अधिकारी
# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**(महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदींन्वये विविध प्राधिकरणांच्या निवडणुका-२०२२)**
**एकरूप परिनियम दि. १७ मे, २०१७ मधील तरतूद क्र. १७ (२) प्रमाणे अपील क्र. ३/२०२३**

**श्री. संजय प्रकाश निंबाळकर**
वय- ६२ वर्षे, व्यवसाय- धंदा
आनंद नगर, उस्मानाबाद. ......................... **अपिलार्थी**

**विरुद्ध**

१. **निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलसचिव**
प्रस्तुत विद्यापीठ, औरंगाबाद
२. **श्री. गोविंद बाळासाहेब देशमुख**
वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर,
ता. अंबाजोगाई, जि. बीड
जि. उस्मानाबाद- ४१३६०६ ......................... **गैरअपिलार्थी**

विषयः- **एकरूप परिनियम दि. १७ मे, २०१७ मधील तरतूद क्र. १७ (२) प्रमाणे अपील**

## निर्णय

प्रस्तुत विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणाच्या निवडणुका महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ व एकरूप परिनियम दि. १७ मे, २०१७ मधील तरतुदींप्रमाणे सुरू आहेत. सदर प्राधिकरणांपैकी उक्त नमूद अधिनियमातील कलम २८ मध्ये नमूद असलेल्या विद्यापीठाच्या अधिसभा या प्राधिकरणाच्या निवडणुकांचे निकाल दि. १३-१२-२०२२ रोजी जाहीर करण्यात आले आहेत. सदर निवडणुकात उक्त नमूद अधिनियमातील कलम २८ (२)(त) प्रमाणे व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून निवडून आलेल्या गैरअपिलार्थी क्र. २ यांच्याबाबत प्रस्तुत अपील अपिलार्थीने दाखल केले आहे. सदर अपील प्राप्त झाल्यानंतर दि. १२-०१-२०२३ रोजी सर्व गैरअपिलार्थींना सुनावणीची नोटीस पाठवून प्रथम सुनावणी दि. ३१-०१-२०२३ व दि. १७-०२-२०२३ रोजी घेण्यात आली.

**सुनावणीदरम्यान अपिलार्थीने मांडलेले मुद्देः-**

अपिलार्थीने सुनावणी दरम्यान त्यांचे प्रस्तुत अपील हे गैरअपिलार्थी क्र. २ यांचे अधिसभेकरिता झालेल्या निवडणुकांमध्ये नामनिर्देशनपत्र वैध ठरविलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने नाराजीने दाखल केले असल्याचे नमूद केले. याशिवाय त्यांच्या अपिलातील मजकूर वाचला असता त्यातही गैरअपिलार्थी क्र. २ यांचे निवडणुकीतील नामनिर्देशनपत्र वैधतेचा आदेश आव्हानित करण्याकरिता प्रस्तुत अपील दाखल करीत असल्याचे म्हटले आहे. याशिवाय महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम २८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून नामनिर्देशनपत्र भरणाऱ्या उमेदवाराच्या महाविद्यालयाचे राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे किंवा राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध प्रमाणपत्र असणे आवश्यक असल्याने अपिलातील गैरअपिलार्थी क्र. २ यांच्या महाविद्यालयाबाबत सदर त्रुटी असल्याकारणाने त्यांचे नामनिर्देशनपत्र हे अवैध ठरत असल्याकारणाने त्यायोगे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांच्या बाबतीत दिलेला निकाल रद्द करावा अशी विनंती केली.

**सुनावणीदरम्यान गैरअपिलार्थींनी मांडलेले मुद्देः-**

गैरअपिलार्थी क्र. २ यांच्या वतीने प्रतिनिधी सुनावणीकामी उपस्थित होते. गैरअपिलार्थींनी त्यांचे लेखी म्हणणे अभिलेखावर सादर करून अपिलातील मुद्दे तथ्यहीन असल्याचे नमूद केले व पुढे प्रस्तुत अपील खारीज करण्याबाबत विनंती केली.

## कारणमीमांसा

एकरूप परिनियम दि. १७ मे २०१७ मधील तरतूद क्र. १७ (२) प्रमाणे प्राप्त अधिकारांन्वये मी प्रस्तुत अपील, त्यातील मुद्दे, गैरअपिलार्थींनी सादर केलेले म्हणणे व सुनावणीदरम्यान दोन्ही पक्षांनी सादर केलेले युक्तिवाद बारकाईने ऐकले. यानुषंगाने एकरूप परिनियम दि. १७ मे २०१७ मधील तरतूद क्र. १७ (२) पुढीलप्रमाणे दिसून येते.

**१७. अपील :—**

(१) अंतिम फेरी झाल्यानंतर फेरमोजणीची मागणी विचारात घेण्यात येणार नाही. जर उमेदवार किंवा उमेदवाराचा प्रतिनिधी इच्छुक असेल तर मतमोजणीच्या विशिष्ट फेरी अखेर आक्षेप घेऊ शकेल मात्र जर नंतरच्या फेरीमधील मतमोजणी सुरू झाली असेल तर ते कोणताही आक्षेप घेऊ शकणार नाहीत.

(२) निवडणुकीच्या निकालाच्या विरोधात, निकाल घोषित झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत कुलगुरुकडे अपील दाखल करता येईल.

उक्त नमूद तरतूद पाहिली असता "निवडणुकीच्या निकालाच्या विरोधात" निकाल घोषित झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत कुलगुरूंकडे अपील दाखल करता येईल असे दिसते. यावरून तरतूद क्र. १७ (२) मधील अपील हे केवळ निवडणूक निकालांच्या विरोधात दाखल करता येते हे स्पष्ट आहे. निवडणूक उमेदवारांच्या "नामनिर्देशनपत्रांच्या वैधतेबाबत" अपील दाखल करण्याकरिता ही तरतूद नाही.

एकरूप परिनियमातील तरतूद क्र. १० (७) मध्ये निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी उमेदवारांच्या नामनिर्देशन पत्रांच्या अनुषंगाने घेतलेल्या निर्णयाबाबत असलेल्या शंका किंवा नामनिर्देशनपत्राच्या वैधतेबद्दल वाद असल्यास अपील दाखल करण्याची तरतूद नमूद करण्यात आली आहे आणि उक्त गैरअपिलार्थी क्र. २ यांच्या नामनिर्देशनपत्रांच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या शंका, वाद-विवाद याबाबत यापूर्वीच तरतूद क्र. १० (७) प्रमाणे या कार्यालयात अपील दाखल झाले होते. सदर अपिलात या कार्यालयाने दि. २५-११-२०२२ रोजी अंतिम आदेश पारीत करून त्यांचे नामनिर्देशनपत्र वैध ठरविलेले आहे आणि त्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी अधिसूचित केल्याप्रमाणे निश्चित दिनांकास मतदानाची प्रक्रिया पूर्ण होऊन अधिसभा या प्राधिकरणाच्या निवडणुकांचा निकाल दि. १३-१२-२०२२ रोजी घोषित करण्यात आला आहे. अशा परिस्थितीत प्रस्तुत अपिलार्थीस जर गैरअपिलार्थी क्र. २ च्या नामनिर्देशनपत्रांबाबत कोणत्याही शंका अथवा वाद-विवाद होता तर उमेदवारांची अंतिम उमेदवार यादी ज्या दिनांकास प्रसिद्ध करण्यात आली त्याचवेळी सदर अंतिम उमेदवार यादी अथवा गैरअपिलार्थीची नामनिर्देशनपत्र स्वीकृती योग्य त्या न्यायालयासमोर आव्हानित करणे आवश्यक होते. परंतु अपिलार्थीने असे काहीही केलेले दिसून येत नाही. प्रस्तुत कार्यालयाने गैरअपिलार्थींच्या नामनिर्देशनपत्राच्या वैधतेबाबत यापूर्वीच दि. २५-११-२०२२ रोजी अंतिम निर्णय दिलेले असल्याकारणाने पुन्हा त्याच मुद्यांवर प्रस्तुत अपील या कार्यालयात दाखल होऊ शकणार नाहीत अशी माझी धारणा आहे. करिता, प्रस्तुत अपील खारीज करणे योग्य राहील, या निष्कर्षापर्यंत मी पोहोचलो आहे.

## निष्कर्ष

१. वरील नमूद कारणास्तव प्रस्तुत अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२. संचिका बंद करण्यात येऊन अभिलेख कक्षास वर्ग करण्यात यावी.

दिनांक :-२० -०२-२०२३
विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद.

**कुलगुरू तथा**
**निवडणूक अपिलीय अधिकारी**